संमिश्र जिल्हा
देशोन्नती परभणी / शनिवार, दि. २५ जून २०१६

# सोमवारी श्री शिवाजी महाविद्यालयात जिल्हास्तरीय चर्चासत्राचे आयोजन

## कुलगुरु डॉ. पंडीत विद्यासागर यांच्या हस्ते उद्घाटन

*कार्यालय प्रतिनिधी* / २४ जून

**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयात सोमवार २७ जून रोजी सीबीसीएस पद्धतीवर एक दिवशीय जिल्हास्तरीय चर्चासत्राचे सकाळी ११ वा. आयोजन करण्यात आले आहे. दोन सत्रात चालणाऱ्या या चर्चासत्राचे उद्घाटन स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे कुलगूरु डॉ. पंडीत विद्यासागर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

सदरील चर्चासत्राच्या पहिल्या सत्रात कुलगुरु डॉ. पंडीत विद्यासागर, प्र. कुलगूरु डॉ. जी.एन. शिंदे, संचालक डॉ. डी. बी. पानसरकर मार्गदर्शन करणार आहेत. तर दुसऱ्या चर्चासत्रात डॉ. अजय टेंगसे, डॉ. सर्जेराव शिंदे, डॉ. प्रशांत वक्ते आणि डॉ. आर. व्ही. देशमुख हे शंका निरसन करतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणुन प्र. कुलगुरु, डॉ. जी. एन. शिंदे हे राहणार आहेत. स्वा. रा. ती. विद्यापीठाच्या कला, वाणिज्य, विज्ञान व सामाजीक शास्त्रे या विद्याशाखांतील पदवी स्तरावरील अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या वर्षात चॉईसबेस्ड क्रेडीट सिस्टीम पॅटर्न लागु करण्यात आला आहे.

या बाबतची संकल्पना, अभ्यासक्रम, रचना, वेळापत्रक, गुणवर्ग पद्धती, ग्रेड पद्धती आदी बाबत शिक्षकांना माहिती होण्याकरीता चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या एक दिवशीय चर्चासत्रात जास्तीत जास्त महाविद्यालयांनी सहभागी व्हावे असे आवाहन मुख्य संयोजक प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. रोहिदास नितोंडे, सचिव प्रबंधक विजय मोरे, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापुरकर यांनी केले आहे.

पुण्य नगरी
शनिवार, २५ जून २०१६

# सीबीसीएस पध्दतीवर चर्चासत्र

परभणी - श्री शिवाजी महाविद्यालयात सीबीसीएस पध्दतीवर एक दिवसीय जिल्हास्तरीय चर्चासत्र सोमवार २७ जून रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आले आहे.चर्चासत्राचे उद्‌घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी हेमंत जामकर राहणार आहेत. यावेळी प्रभारी कुलगुरू डॉ.जी.एन.शिंदे, डॉ.डी.बी. पानसकर हे मार्गदर्शन करणार आहेत. दुसऱ्या सत्रामध्ये डॉ. आर.व्ही. देशमुख यांचे विद्या शाखानिहाय मार्गदर्शन व शंका निरासन करणार आहेत. चर्चासत्राचा समारोप सायंकाळी ४.३० वाजता होणार आहे. यावेळी प्रभारी कुलगुरू डी.जी.एन.शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांची उपस्थिती राहणार आहे. या चर्चासत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजक प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, डॉ.रोहिदास नितोंडे, विजय मोरे, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, डॉ.विजया नांदापूरकर यांनी केले आहे.